

देगलूर : देगलूर महाविद्यालयात अठरा तास अभ्यास उपक्रमाने डॉ. आंबेडकर यांना गुरूवारी अभिवादन करण्यात आले.

# देगलूरला १८ तास अभ्यास

**देगलूर** : डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त देगलूर महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागाकडून अठरा तास अभ्यास हा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमास सकाळी पाच वाजता सुरुवात झाली. प्राचार्य डॉ. संजय पाटील यांच्या हस्ते प्रतिमेचे पुजन करण्यात आले. यावेळी प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि महाविद्यालयातील स्पर्धा परिक्षेचा अभ्यास करत असलेले विद्यार्थी ग्रंथालयाच्या अभ्यासिकेत सकाळी पाच वाजता दाखल झाले. महाविद्यालय प्रशासनाकडून या विद्यार्थ्यांना अल्पोपहार आणि जेवणाची व्यवस्था करण्यात आली होती. यावेळी उपप्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार, उपप्राचार्य निवृती गोविंदवार, पर्यवेक्षक प्रा. संग्राम पाटील, कार्यालय अधीक्षक गोविंद जोशी यांनी सदिच्छा भेट दिली. कार्यक्रम यशस्वीतेसाठी ग्रंथपाल साईनाथ शिंदे, श्रीनिवास नाईक, बाबू इंगळे, भीम कर्णे, दीपक संगमकर, पांडुरंग कदम यांनी परिश्रम घेतले.